**" मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत कोकण विभागासाठी सुधारीत आकारमानाच्या शेततळयास विशेष बाब म्हणून मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग

शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.११५/रोहयो-५

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक — २० मे, २०१७.

वाचा-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६.

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६.

३) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे पत्र क्र. जा.क्र.विआकोंवि/रोहयो/४८५/२०१६, दिनांक १९ डिसेंबर २०१६.

४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक —जा.क्र. /मृदसं / शे.कक्ष /२अ/१४/२०१७, दिनांक १२ जानेवारी, २०१७.

**प्रस्तावना -**

राज्यातील शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच शेतक-यांसाठी संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मागेल त्याला शेततळे" ही योजना सुरू करण्यात आहे. तसेच सदर योजना कोकण विभागांसह संपूर्ण राज्यात दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे. कोकण विभागातील भौगोलिक परिस्थिती व शेतक-यांची जमिनधारण क्षमता अत्यल्प असल्याने "मागेल त्याला शेततळे " या योजनेंतर्गत दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयातील ०.६० हेक्टर किमान धारण क्षेत्राची अट शिथिल करून ती ०.२० हेक्टर करावी व सुधारीत आकारमानाच्या शेततळ्यांना विशेष बाब म्हणून मान्यता मिळावी अशी मागणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी उपरोक्त वाचा येथील नमूद दिनांक १९ डिसेंबर, २०१६ च्या पत्रान्वये केली होती. त्यावर संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने "मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत कोकण विभागासाठी सुधारीत शेततळ्यांच्या आकारमानांना विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

"मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत कोकण विभागासाठी विशेष बाब म्हणून दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील ०.६० हेक्टर किमान धारण क्षेत्राची अट शिथिल करून ती ०.२० हेक्टर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) कोकण विभागातील भौगोलिक परिस्थिती व शेतक-यांची जमिनधारण क्षमता विचारात घेवून दिनांक १७.२.२०१६ च्या शासन निर्णयातील मंजूर आकारमानाप्रमाणे (लांबी व रूंदी) किना-यालगतचे खार जमिन क्षेत्रासाठी इनलेट आयऊटलेट विरहीत खोली २.०० मीटर यानुसार कोकण विभागातील शेततळयांच्या सुधारीत आकारमानास खालीलप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शेततळयाचे आकारमान | | | शेततळया चा बाजू उतार | माती कामाचे परिमाण (घ.मि.) | होणारा पाणीसाठी (टीसीएम) | दर सुचीतील किमान बाब दरानुसार खोदाईसाठी लागणारी रक्कम (रुपयांत) | प्रस्तावित अनुदान रक्कम (रुपयांत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लांबी (मीटर) | रुंदी (मीटर) | खोली (मीटर) | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २० | १५ | २ | १ : १ | ४७०.६७ | ०.४७१ | १९,८६२ | १९,८६२ |
| २ | २० | २० | २ | १ : १ | ६५०.६७ | ०.६५१ | २७,४५८ | २७,४५८ |
| ३ | २५ | २० | २ | १ : १ | ८३०.६७ | ०.८३१ | ३५,०५४ | ३५,०५४ |
| ४ | २५ | २५ | २ | १ : १ | १०६०.६७ | १.०६१ | ४४,७६० | ४४,७६० |
| ५ | ३० | २५ | २ | १ : १ | १२९०.६७ | १.२९१ | ५४,४६६ | ५०,००० |
| ६ | ३० | ३० | २ | १ : १ | १५७०.६७ | १.५७१ | ६६,२८२ | ५०,००० |

ब) खार जमीन क्षेत्र व किनाऱ्यालगतचे क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्रासाठी मंजूर आकारमानाप्रमाणे (लांबी व रूंदी) इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत प्रकाराची खोली ३.०० मीटर यानुसार शेततळयांच्या सुधारीत आकारमानास खालीलप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शेततळयाचे आकारमान | | | शेततळया चा बाजू उतार | माती कामाचे परिमाण (घ.मि.) | होणारा पाणीसाठी (टीसीएम) | खोदाईसाठी लागणारी रक्कम (रुपयांत) | योजनेतून सध्या देय अनुदान (रु.) | | इनलेट आऊटलेट विरहित प्रस्तावित अनुदान | इनलेट आऊटलेट सह प्रस्तावित अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | खोली (मी.) | | | | | इनलेट आऊटलेट विरहित | इनलेट आऊटलेट सह | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | १५ | १५ | ३ | १ : १ | ४४१ | ०.४४१ | १८,६१० | ० | २२,११० | १८,६१० | २२,११० |
| २ | २० | १५ | ३ | १ : १ | ६२१ | ०.६२१ | २६,२०६ | २६,२०६ | २९,७०६ | २६,२०६ | २९,७०६ |
| ३ | २० | २० | ३ | १ : १ | ८७६ | ०.८७६ | ३६,९६७ | ३६,९६७ | ४०,४६७ | ३६,९६७ | ४०,४६७ |
| ४ | २५ | २० | ३ | १ : १ | ११३१ | १.१३१ | ४७,७२८ | ४७,७२८ | ५०,००० | ४७,७२८ | ५०,००० |
| ५ | २५ | २५ | ३ | १ : १ | १४६१ | १.४६१ | ६१,६५४ | ५०,००० | ५०,००० | ५०,००० | ५०,००० |
| ६ | ३० | २५ | ३ | १ : १ | १७९१ | १.७९१ | ७५,५८० | ५०,००० | ५०,००० | ५०,००० | ५०,००० |
| ७ | ३० | ३० | ३ | १ : १ | २१९६ | २.१९६ | ९२,६७१ | ५०,००० | ५०,००० | ५०,००० | ५०,००० |

२. या शासन निर्णयास दि.१७/२/२०१६ व दि.१०/१०/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७०५२२१०२२०५२६१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.**

**( डॉ. प्रमोद शिंदे )**
**उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क,मुंबई (प्रसिध्दीकरीता),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व उपायुक्त (विकास)
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो व सर्व मंत्रालयीन विभाग,
निवडनस्ती रोहयो-५